SUBHVAISHALI FOUNDATION August 2026

# NEWSLETTER

## 1 BEEJANKUR – A GREEN BEGINNING

On the occasion of India's 80th Independence Day, Subhvaishali Foundation, in collaboration with Kreative Charitable Trust, organized the Beejankur Seed Ball Initiative at Sadguru Gangagiri Vidyalaya, Naur, Taluka Shrirampur. The initiative engaged hundreds of students in environmental awareness, teamwork, and meaningful action towards a greener future.
The program was graced by
Dr. Bhoopal Shinde and Krishna Gund.






## 2 BEEJANKUR AT A GLANCE

- 🌱 15,000 Seed Balls Prepared & Dispersed
- 🫘 19,965 Seeds Used
- 👩‍🎓 748 Students Involved
- 🌳 8 Species Used

## 3 ONE INITIATIVE. THOUSANDS OF SEEDS. ONE GREENER FUTURE

Every seed carries the possibility of new life.
Every young participant carries the power to create change.

"Planting seeds today.
Growing a greener tomorrow."





## 4 ONE STUDENT – TEN SEED BALLS

### FROM LEARNING TO ACTION

Beejankur transformed environmental education into a hands-on learning experience.
Students actively participated in preparing seed balls using soil, organic materials and locally available seeds, discovering how a simple activity can become a meaningful step towards environmental conservation

## 5 SEED BALL MAKING ACTIVITY

The activity helped students develop:
🌿 Environmental Awareness
Understanding the importance of nature, biodiversity and native vegetation.
🤝 Teamwork & Participation
Working together towards a common environmental goal Learning through direct involvement and hands-on experience.
🌳 Responsibility Towards Nature
Recognising that environmental protection begins with individual action.





## 6 LEARNING BEYOND THE CLASSROOM

Beejankur connected education with environmental responsibility.
From preparing seed balls to learning about local species, students experienced how their actions can contribute to a greener future.
•748 STUDENTS
•13 TEACHERS
•11 VOLUNTEERS

"The best environmental lessons are the ones we experience, not just the ones we read."

## 7 COMMUNITY PARTICIPATION

Students, teachers, environmental enthusiasts and local citizens participated in the initiative. The programme highlighted the importance of collective community action for environmental conservation.



1 ) Subhvaishali foundation is dedicated to connecting education with environmental responsibilities.
2 ) 15,000 Seed Balls Prepared & Dispersed
3 ) We believe, TOGETHER WE CAN!

For us, teamwork lies at the core of everything we do!

Dear students, volunteers, supporters,and everyone who contributed to the Bejankur Project, we extend our heartfelt gratitude for your valuable participation and dedication.

Together, we have transformed a simple idea into meaningful action through 15,000 Seed Balls and 19,965 seeds of 08 local tree species.

Thank you for being a part of our journey. Stay tuned for our monthly newsletters.

“A seed may be small, but the future it carries is limitless.”

Every Seed Ball represents a step towards protecting biodiversity, nurturing local tree species, and creating a greener environment.

Together, let us continue to plant hope, inspire young minds, and grow a greener tomorrow.
Bejankur – Planting Seeds, Growing Futures. 🌱

# MEDIA COVERAGE

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
epaper.deshdoot.com
22 Aug 2026 - Page 04

## नाऊर सद्गुरू गंगागिरी विद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

**नाऊर (वार्ताहर) :** श्रीरामपूर तालुक्यातील नाऊर येथील रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरू गंगागिरी विद्यालयात स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा अभिनव संदेश देण्यात आला. सुभवैशाली फाउंडेशन आणि क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बीजांकुर हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून विविध १८ स्थानिक वृक्षप्रजातींच्या सुमारे ११ हजार बियांचे मातीच्या गोळ्यांमध्ये रूपांतर करून बीजगोळे तयार करण्यात आले.

एक विद्यार्थी, दहा बीजगोळे-एक हरित भविष्य या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी माती, सेंद्रिय घटक आणि विविध स्थानिक वृक्षांच्या बियांचा वापर करून हे बीजगोळे तयार केले. पावसाळ्यात योग्य ठिकाणी हे बीजगोळे टाकण्यात येणार असून, पावसाच्या पाण्यामुळे त्यातील बियांना अंकुर फुटून नैसर्गिक पद्धतीने नवीन रोपांची निर्मिती होण्यास मदत होणार आहे.

यावेळी क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्टचे कृष्णा गुंड व सुभवैशाली फाउंडेशनचे अध्यक्ष



मयूर ठोके यांनी उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. बीजांकुर उपक्रमामुळे परिसरातील हिरवाई वाढविण्यासोबतच जैवविविधतेचे संवर्धन, स्थानिक वृक्षप्रजातींचे संरक्षण, पर्यावरणाविषयी जबाबदारीची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब गांगुर्डे यांच्यासह सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास सुभवैशाली फाउंडेशनचे अध्यक्ष मयूर ठोके, प्रकल्प अधिकारी प्रसाद दुशिंग, डॉ. भूपाल शिंदे, क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्टचे सर्वेसर्वा कृष्णा गुंड, प्रा. जलाल पटेल, माजी सरपंच सोन्याबापू शिंदे, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर शिंदे, प्रितेश देसाई, प्रताप शिंदे, दिलीप देसाई, डॉ. गोरक्षनाथ गायकवाड, संदीप देसाई, कचरू त्रिभुवन, अशोक गहिरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी ढोक नांदूर येथील भवार परिवाराच्यावतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके भेट देण्यात आली.

---

**पर्यावरण** | श्रीरामपूरमध्ये ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ७००० बीजगोळ्यांची निर्मिती, लागवड स्तुत्य

## ‘सुभवैशाली', 'क्रिएटिव्ह ट्रस्ट'च्या उपक्रमाचे कौतूक

▸ **श्रीरामपूर (वा.)**भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात एक अनोखा आणि निसर्गपूरक उपक्रम राबविण्यात येणार आहे. सुभवैशाली फाउंडेशन आणि क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, १५ ऑगस्ट २०२६ रोजी 'बीजांकुर' या विशेष मोहिमेअंतर्गत तब्बल ७००० बीजगोळे (Seed Balls) तयार करून त्यांची लागवड केली जाणार आहे. हा स्तुत्य उपक्रम नाऊर येथील सद्गुरु गंगागिरी विद्यालयात सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत होणार आहे.अशी माहिती उपक्रमाचे समन्वयक कृष्णा चांगदेव गुंड यांनी दिली.



### एक विद्यार्थी, पाच बीजगोळे, एक हरित भविष्य

स्वातंत्र्यदिनाचा उत्सव केवळ झेंडावंदनापुरता मर्यादित न ठेवता, त्याला पर्यावरण संवर्धनाची जोड देण्याचा हा आयोजकांचा एक नाविन्यपूर्ण प्रयत्न आहे. 'बीजांकुर' या उपक्रमाचे घोषवाक्य एक विद्यार्थी, पाच बीजगोळे, एक हरित भविष्य असे निश्चित करण्यात आले आहे. या संकल्पनेच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच निसर्गाविषयी आणि वृक्षलागवडीविषयी आवड निर्माण करण्याचे मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या निसर्गपूरक सोहळ्यात परिसरातील सर्व नागरिकांनी, तरुणांनी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सुभवैशाली फाउंडेशन व क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

### ‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद’ यातून प्रेरणा

सद्यस्थितीतील वाढते तापमान आणि पर्यावरणाचा ढासळता समतोल पाहता, अशा प्रकारच्या बीजगोळे निर्मितीच्या उपक्रमांची आज नितांत आवश्यकता आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी रयत शिक्षण संस्थेच्या 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या विचारांची प्रेरणा घेत, सुभवैशाली फाउंडेशन आणि क्रिएटिव्ह चॅरिटेबल ट्रस्टने पुढाकार घेतला आहे.

### पावसाळ्याच्या पोषक वातावरणाचा लाभ

सद्गुरु गंगागिरी विद्यालय, नाऊर (ता. श्रीरामपूर) या ठिकाणी विद्यार्थी, शिक्षक आणि पर्यावरणप्रेमी नागरिक एकत्र येऊन या ७००० बीजगोळ्यांची निर्मिती करतील. माती आणि सेंद्रिय खतांच्या मिश्रणातून तयार केलेल्या या बीजगोळ्यांचे नंतर योग्य ठिकाणी रोपण केले जाईल, जेणेकरून पावसाळ्याच्या पोषक वातावरणात या बिया रुजून त्यातून नवीन रोपे आणि पर्यायाने मोठे वृक्ष उभे राहतील.

# DONATE US

- **Bank Name: Axis Bank Vaijapur**
- **Account Name: Subhvaishali Foundation**
- **Account Number: 926010021523407**
- **IFSC Code: UTIB0000165**
- **Mobile No: 9307085598**

## Follow Us

सर्वे भवन्तु सुखिनः| सर्वे सन्तु निरामयाः|
सर्वे भद्राणि पश्यन्तु| मा कश्चिद् दुःखभाग्भवेत्||

May all be happy,May all be free from illness,
May all see what is auspicious,
May no one suffer.